**प्रेसनोट                    दि.०७/०८/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## तडीपार प्रणव खैरमोडे या आरोपीस ठोकल्या बेड्या

दि.०६/०८/२०१९ रोजी रात्रौ २१/०० ते दि.०७/०८/२०१९ रोजी सकाळी ०९/०० वा. पर्यंत रात्रपाळी कर्तव्यास असणारे तपास पथकातील कर्मचारी पोलीस शिपाई शिंदे व महांगडे असे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्तीस असताना पोलीस शिपाई शिंदे यांना त्यांच्या खास बातमीदारकडून बातमी मिळाली की,बिबवेवाडी पोलीस ठाणे रेकॉर्डवरील तडीपार आरोपी नामे प्रणव सतिष खैरमोडे ऊर्फ मच्छि बाब्या हा अप्पर बस डेप्पो पासुन सुखसागर नगर बिबवेवाडी पुणे कडे जाणारे रोडवर फिरत असल्याची बातमी मिळाल्याने पो.शि.रोहित शिंदे यांनी लागलीच पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्तीस असणारे पोलीस उप निरीक्षक श्री थोरात यांना बातमीचा आशय कळवुन सदर ठिकाणी स्टाफसह जावुन ते ओखळत असलेला नमुद आरोपी हा त्याचे तडीपार काळात बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत येवुन फिरत असल्याचे दिसल्याने तो पोलीसांना बघुन पळून जात असताना त्याचा पाठलाग करुन थोडयाच अंतरावरुन ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचे बाबत चौकशी केली असता त्यास मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-०२ पुणे शहर यांनी त्यांचेकडील आदेश क्र.१७/२०१८ दि.२१/०९/२०१८ अन्वये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पुणे शहर आयुक्तलय हद्दीतुन एक वर्षाकरीता तडीपार केले असुन त्यांने कोणतीही परवानगी न घेता सदर आदेशाचे उल्लंघन केल्याने त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणेस महाराष्ट्र पोलीस अधिनियम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री थोरात,पोलीस शिपाई रोहित शिंदे, महांगडे यांनी केली आहे.